# कृषि विज्ञान केंद्र

मराठवाडा शेती सहाय्य मंडळ, खरपुडी, जालना

# विकसित कृषि संकल्प अभियान, खरीप - २०२५

## तूर पिकातील एकात्मिक कीड व रोग व्यवस्थापन

### तूरीवरील प्रमुख किडी :

* शेंगा पोखरणारी अळी / घाटे अळी
* पिसारी पतंग
* शेंगमाशी
* ठिपक्याची शेंगा पोखरणारी अळी
* पाने गुंडाळणारी अळी
* खोडमाशी
* पट्टेरी भुंगेरे
* खोडावरील ढेकूण

### एकात्मिक किड व्यवस्थापन :

### मशागतीय पध्दती :

* घाटेअळीचे कोष नष्ट करण्यासाठी उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरट करावी.
* शिफारस केलेल्या वाणाचीच योग्य अंतरावर पेरणी करावी.
* ज्यावेळी तुरीची सलग पेरणी केली जाते त्यावेळेस बियाण्यात १ टक्का ज्वारी अथवा बाजरीचे बी मिसळून पेरणी करावी. तुरीबरोबर ज्वारी, बाजरी, मका अथवा सोयाबीन ही आंतरपिके घ्यावीत.
* क्षेत्रिय (झोनल) पेरणी पध्दतीचा अवलंब करावा. संपूर्ण गावामध्ये एकाचवेळी पेरणी करावी.
* वेळेवर आंतरमशागत करून पीक तण विरहित ठेवावे.

### यांत्रिक पध्दती :

* पाने गुंडाळणाऱ्या अळीची प्रादुर्भावग्रस्त पाने गोळा करून अळीसहीत नष्ट करावीत.
* शेताच्या बांधावरील तुरीच्या शेंगा पोखरणाऱ्या अळीची पर्यायी खाद्यतणे उदा. कोळशी, रानभेंडी, पेटारी ही तणे वेळोवेळी काढून नष्ट करावीत.
* पुर्ण वाढ झालेल्या अळ्या वेचून त्यांचा नाश करावा.
* पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी ५० ते ६० पक्षी थांबे शेतात लावावेत, जेणे करून त्यावर बसणारे पक्षी शेतातील अळ्या वेचून खातील.
* शेंगा पोखरणाऱ्या हिरव्या अळीसाठी पीक कळी अवस्थेत आल्यापासून हेक्टरी ५ कामगंध सापळे लावावेत जेणे करून किडीची आर्थिक नुकसानीची पातळी कळेल.
* तुरीच्या झाडाखाली पोते टाकून झाड हलवावे आणि पोत्यावर पडलेल्या अळ्या गोळा करून नष्ट कराव्यात.

### जैविक पध्दती :

* पिकास फुलकळी येऊ लागताच प्रतिबंधात्मक उपाय म्हणून ५ टक्के निंबोळी अर्क १ टक्का साबण चूरा याची फवारणी करावी.
* शेंगा पोखरणारी हिरवी अळी लहान अवस्थेत असताना एच.ए.एन.पी.व्ही. विषाणुची २५० एल. ई. (२x१०$^{९}$ पीओबी प्रति समतुल्य अळी) प्रति हेक्टर प्रमाणे फवारणी सायंकाळी करावी.




शेंगापोखरणारी अळी



शेंगापोखरणारी अळीचा पतंग



शेंगापोखरणारी अळीचा कोष



शेंगापोखरणारी अळीची अंडी

## रासायनिक पध्दती :

* रासायनिक किटकनाशकांची फवारणी पट्टा पध्दतीने अथवा खंड पध्दतीने केल्यास परोपजीवी किडींच्या संवर्धनात मदत होते.

| किडी | किटकनाशकाचे रासायनिक नाव | प्रमाण/१० लि.पाणी (साधा पंप) |
|---|---|---|
| शेंगा पोखरणाऱ्या किडी (शेंगा पोखरणारी अळी, पिसारी पतंग, शेंगमाशी) ठिपक्याची शेंगा पोखरणारी अळी | क्विनॉलफॉस २५ ईसी किंवा | २८ मिली |
| | ईमामेक्टीन बेन्झोएट ५ एसजी किंवा | ४.५ ग्रॅम |
| | स्पिनोसॅड ४५ एससी किंवा | ३ मिली |
| | क्लोरॅनट्रॉनीलीप्रोल १८.५ एससी किंवा | ३ मिली |
| | फ्ल्युबेन्डामाईड ३९.३५ एससी किंवा | २ मिली |
| | इंडोक्झाकार्ब १४.५ एससी किंवा | ८ मिली |
| | ल्युफेन्युरॉन ५.४ ईसी किंवा | १२ मिली |
| | क्लॉरॅनट्रेनिलीप्रोल ९.३% + लॅमडा साहॅलोथ्रीन ४.६ झेड सी किंवा | ४ मिली |
| | लॅमडा साहॅलोथ्रीन ५ ईसी | १० मिली |
| | ल्युफेन्युरॉन ५.४ ईसी किंवा | ३ मिली |

टिप : १) पावर स्प्रेसाठी मात्रा तीन पट करावी.

२) शेतात किटकनाशकांचा वापर करतांना हातमोजे व तोंडावर मास्कचा वापर करावा.

## आर्थिक नुकसानीची पातळी :

| किड | आर्थिक नुकसान पातळी |
|---|---|
| घाटेअळी | कामगंध सापळ्यात सलग २ ते ३ दिवस ८ ते १० पतंग/सापळा |
| घाटेअळी | प्रत्येक मिटर ओळीवर फुलोऱ्याच्यावेळी किंवा फुलोऱ्यानंतर कधिही दोन अळ्या किंवा ५ टक्के शेंगाचे नुकसान |
| पानेगुंडाळणारी अळी व पिसारी पतंग | ५ अळ्या प्रति १० झाडे |
| शेंगमाशी | ५ टक्के हिरव्या प्रादूर्भावग्रस्त शेंगा |

## तुरीवरील प्रमुख रोग :

* मर
* फायटोफ्थोरा करपा
* कोरडी मुळकूज / मायक्रोफोमीनाचा करपा
* वांझरोग

## तुरीवरील रोगाचे एकात्मिक व्यवस्थापन :

१) उन्हाळ्यात खोल नांगरट करावी जेणेकरुण सूर्यकिरणामुळे बुरशीचे बिजाणू नष्ट पावतील.

२) पिकांचा फेरपालट व आंतरपिकाचा शेतीत समावेश असावा जेणेकरुन बुरशीच्या वाढीस आळा बसेल.

३) बिजप्रक्रियेमध्ये १ ते १.५ ग्रॅम आंतरप्रवाही (उदा. कार्बेन्डाझिम) आणि २.५ ग्रॅम स्पर्शजन्य (उदा. थायरम) प्रति किलो बियाण्यास चोळावे किंवा कार्बेन्डाझिम ३७.५ टक्के + थायरम ३७.५ टक्के या बुरशीनाशकाची ४ ग्रॅम प्रति किलो बियाण्यास वापरावेत.

४) बिजप्रक्रियेमध्ये १२ ग्रॅम ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्स प्रति किलो बियाण्यास वापरावेत.

५) मर, फायटोफ्थोरा करपा, कोरडी मुळकूज यापैकी कुठल्याही रोगाची लक्षणे दिसताच ट्रायकोडर्मा किंवा बायोमिक्सची २०० ग्रॅम/ मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे रोगग्रस्त भागामध्ये आळवणी करावी.

६) मर व वांझ रोग प्रतिकारक वाण जसे की बी.एस.एम.आर.-७३६, बी.एस.एम.आर.-८५३, बी.डी.एन.-७१६, गोदावरी, रेणुका व बी.डी.एन.-७११ या सारख्या वाणांचा वापर करावा.

७) खडका, माजलगाव लोकल, काळी तूर व इतर स्थानिक मर रोगास सहजबळी पडणाऱ्या वाणांचा वापर करू नये.

८) फायटोफ्थोरा चा करपा रोगाची लक्षणे दिसल्यास रासायनिक बुरशीनाशकामध्ये मेटाल्काझिल घटक नियंत्रण म्हणून प्रभावीअसल्याचे दिसून आले आहे. तेंव्हा मेटाल्कझिल ०.१ टक्का अथवा मेटीरम + प्याराक्लोस्ट्रोबीन अशा संयुक्त बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणे रोगग्रस्त भागामध्ये आळवणी करावी.

९) कोरडी मुळकूज असेल तर कॉपरऑक्सीक्लोराईड ५० टक्के ची ०.२५ टक्के या प्रमाणे शेंगा परिपक्व होण्याच्या अवस्थेमध्ये आळवणी करावी. पीक शेंगा भरण्याच्या अवस्थेत पाणी द्यावे तसेच जमिनीत ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी.

१०) तुर पिकात खोडवा घेऊ नये.

११) रोगग्रस्त झाडे त्वरीत उपटून नष्ट करावीत.

* लेखन व संकलन *

अजय मिटकरी (विषय विशेषज्ञ, पीक संरक्षण)

मो. ९०२८२५४९४७

श्रीकृष्ण सोनुने (वरीष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख)

मो. ९०२८२५४९४६

संदर्भ : व.ना.म.कृ.वि.,परभणी